भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

रु. 100

Rs. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2021 ◑ YU 418220

अनु.क्र. १९२८ दिनांक ०६/०७/२१

श्री श्री १०८ आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.सो

यांनी रुपये १००/- चा जनरल स्टॅम्प खरेदी केला

हा रुपये — चा स्टॅम्प व भरतीस

रुपये — चा जनरल स्टॅम्प

— या कारणाकरिता दिला

हस्ते राहुल ३५१८४

कोषागार कार्यालय सोलापूर
- 5 JUL 2021
मुद्रांक प्रमुख लिपिक / उपलेखापाल

मुद्रांक विक्रेता ... क्र. 2511005

परवाना ता. 2/12/1998 मो. नं. 98221869..

सामंजस्य करार

**MEMORANDUM OF UNDERSTANDING**

**BETWEEN**

प्राकृत विभाग,

भाषा व वाङ्मय संकुल

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

आणि

श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.,सोलापूर

श्री १०८ आचार्य जंबूसागर ग्रंथमाला असोसिएशन सोलापूर.

प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

- समन्वय आणि अंमजबजावंणी

1. सदर कराराची जबाबदारी, समन्वयक आणि अंमलबजावणीसाठी श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.,सोलापूर चे अध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच विद्यापीठाचे कुलसचिव, भाषा व वाङ्मय संकुलाचे संचालक आणि प्राकृत विभागाचे समन्वयक काम करतील.

2. सदर सामंजस्य करार 100 रूपयेच्या स्टँप पेपरवर, कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतींमध्ये अंमलात येत आहे.

3. सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयक अधिकाऱ्यात होत आहे. तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षापर्यंत अंमलात येत आहे.

संचालक
भाषा व वाङ्मय संकुल
डॉ. प्रभाकर कोळेकर
Director
School of Languages and Literature
Punya... Ahilyadevi Holkar
Sol... ...iversity, Solapur

कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

सचिव
CA L. S. Magdum
श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.,सोलापूर
श्री. १०८ आचार्य जंबूसागर ग्रंथमाला असोसिएशन
सोलापूर.

अध्यक्ष
Shri A. D. Upadhye.
श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.,सोलापूर
श्री. १०८ आचार्य जंबूसागर ग्रंथमाला असोसिएशन
सोलापूर.

प्रस्तावना

प्राकृत शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानप्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये प्राकृत भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, शोधनिबंधाना पारितोषिक, ललित, ललितेतर, संपादित ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. विद्यापीठाच्या प्राकृत विभागामार्फत विविध उपक्रम आयोजित केले जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याचे काम केले जाते. या सामंजस्य करारातून श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.,सोलापूर या संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन करता येईल. विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांसाठी विद्यापीठाचा प्राकृत विभाग व श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.,सोलापूर यांच्यात हा सामंजस्य करार करण्यात येत आहे.

वरील नमूद केलेल्या श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.,सोलापूर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या संस्था दिनांक 07/07/2021 रोजी एकमेकांबरोबर सामंजस्य करार करत आहेत. सदर कराराची अंमलबजावणी पुढील पाच वर्षांसाठी करण्यात येईल. या कराराची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत :

उद्दिष्टे :

1. प्राकृत भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.
2. साहित्य संमेलन, चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.
3. विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थी केंद्रित विविध उपक्रमांसाठी सहयोग व सहकार्य करणे.
4. निबंध, वक्तृत्व, वाद–विवाद, प्रश्नमंजुषा कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथा–कथन इ. स्पर्धांचे आयोजन करणे.
5. व्यक्तिमत्त्व विकास व कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.
6. सर्जनशील लेखन व उपयोजित प्राकृत लेखन प्रकल्प राबविणे.
7. विद्यार्थ्यांचा भाषिक विकास करण्यासाठी सहकार्य करणे.
8. प्राकृत भाषेतील दर्जेदार साहित्यकृती विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देणे.
9. विद्यार्थ्यांना साहित्य निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे. त्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करणे.
10. प्राकृत भाषा संवर्धनासाठी प्रयत्न करणे.

अटी आणि शर्थी :

1. विद्यापीठातील प्राकृत विभागाच्या विविध उपक्रमामध्ये श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.,सोलापूर ही संस्था सक्रीय सहभाग घेईल. तसेच श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला

श्री. १०८ आचार्य जंबूसागर ग्रंथमाला असोसिएशन सोलापूर.

प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

एसो.,सोलापूर यांच्या विविध उपक्रमांमध्ये विद्यापीठातील विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी होतील.

2. श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.,सोलापूर या संस्थेचा एखादा उपक्रम विद्यापीठाच्या प्राकृत विभागाने राबवायचा असल्यास संकल्पित आर्थिक तरतूद संस्था करेल. मूलभूत सोयी विद्यापीठाने उपलब्ध करावयाच्या आहेत. तरतूदीपेक्षा अधिक खर्च झाल्यास परस्पर चर्चेतून सामंजस्याने सहकार्य करणे अपेक्षित आहे. सामंजस्य करारातंर्गत होणाऱ्या कोणत्याही उपक्रमाकरिता कोणत्याही प्रकारचा भत्ता देणे बंधनकारक नाही.
3. सामंजस्य करारांतर्गत झालेल्या कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांच्या माहितीची गोपनियता राखणे संस्थेला बंधनकारक राहील.
4. सदर करारनाम्याच्या अनुषंगाने काही वाद अथवा असहमतीचे मुद्दे उपस्थित झाल्यास दोन्ही पक्षांनी मा.कुलगुरू यांच्या सोबत चर्चा करण्याचे आहे, व चर्चे अंती मा.कुलगुरू यांनी घेतलेल्या निर्णय दोन्ही पक्षांना बंधनकारक राहील.
5. वर नमूद प्रमाणे करारनामा विहित कालवधी आधी रद्द करावयाचे झाल्यास या प्रकरणी सर्व बाबींची व या प्रकरणी विविध कार्यक्रमांसाठी झालेला खर्चाबाबत विद्यापीठ व संस्था आपापल्या हिश्याप्रमाणे जबाबदारी स्वीकारून कार्यवाही करतील तसेच संस्थेने सामंजस्य करारांतर्गत कार्यक्रमाचे/उपक्रमाचे महत्त्वाचे रेकॉर्ड व तपशील विद्यापीठाकडे हस्तांतरित करावे लागेल.
6. सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.
7. यासांठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

**एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे :**

1. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये सहकार्य करणे.
2. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.
3. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थांकडून शैक्षिणिक गुणवत्ता व संशोधनांसाठी निश्चित योजना तयार करणे.
4. प्राकृत भाषा संवर्धनासाठी विविध उपंक्रम राबविणे.
5. विद्यार्थीकेंद्रित उपक्रम आयोजित करणे, शैक्षणिक प्राकृत भाषा विकासासाठी विविधं उपक्रम राबविणे व त्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे.

श्री. १०८ आचार्य जंबूसागर ग्रंथमाला असोसिएशन
सोलापूर.

प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

समारोप :

प्रस्तुत करार हा केवळ शैक्षणिक व प्राकृत भाषा संवर्धनासाठी विविध उपक्रम घेण्यासाठी करण्यात आलेला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध उपक्रमामध्ये सहभागी करून घेता येईल. तसेच श्री. 108 आचार्य जंबूसागर ग्रंथमाला एसो.,सोलापूर या संस्थेच्या माध्यमातून विद्यापीठामध्ये विविध उपक्रम घेता येतील. विद्यार्थ्यांना प्राकृत साहित्याची माहिती करून देणे. त्यांना प्राकृत साहित्याची आवड निर्माण होईल या दृष्टीने प्रयत्न करणे. यासाठी एकमेकांना आवश्यक ते सहकार्य करणे हा या कराराचा मुख्य हेतू आहे.

श्री. १०८ आचार्य जंबूसागर ग्रंथमाला असोसिएशन
सोलापूर.

प्र. कुलसचिव
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.